नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १५२ Issue - 152 | वार - बुधवार दि. २८ ऑक्टोबर २०२६ Blow- Wednesday Date 28 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली केल्यास होणार फौजदारी कारवाई

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; दीड कोटी शेतकऱ्यांच्या खात्यांत दोन दिवसांत पाच हजार जमा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील दुष्काळग्रस्त सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाला मंत्रिमंडळाने मंगळवारी निधीसह मंजुरी दिली. येत्या दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यांत रक्कम जमा होण्यास सुरुवात होईल आणि कोणत्याही परिस्थितीत दिवाळीपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांत पैसे पोहोचविण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचवेळी, मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून शेतकऱ्यांना दमदाटी करून कर्जवसुली करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांची तक्रार तातडीने नोंदवून फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश सर्व जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासोबतच प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांबाबत सरकारची भूमिका मांडली. नांदेडमध्ये मायक्रोफायनान्स कंपनीच्या कर्जवसुलीशी संबंधित घडलेल्या घटनेमुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आ- हेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास दिल्याची तक्रार प्राप्त होताच ती नोंदवून घेऊन संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आ- हेत. मायक्रोफायनान्स कंपन्यांनी सक्तीने किंवा दमदाटी करून वसुली करू नये, यासाठी रिझर्व्ह बँकेला (आरबीआय) पत्र पाठविण्यात येणार आहे. अशा प्रकारे बळाचा वापर करणाऱ्या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करून गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा फडणवीस यांनी दिला.



दरम्यान, कर्जत परिसरातील प्रस्तावित पंप स्टोरेज प्रकल्पावरून सुरू असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूम ीवर फडणवीस यांनी हा प्रकल्प पर्यावरणपूरक असल्याचे स्पष्ट केले. सौर आणि पवन ऊर्जेची निर्मिती सूर्यप्रकाश आणि वाऱ्याच्या उप- लब्धतेवर अवलंबून असल्याने या स्रोतांमधून चोवीस तास वीज मिळत नाही. सायंकाळी सौरऊर्जेची निर्मिती होत नाही, तर वारा नसल्यास पवनऊर्जेचे उत्पादनही घटते. त्यामुळे वीज वितरण यंत्रणेवर परिणाम होतो. सौर आणि पवनऊर्जेतील चढ- उतार संतुलित करून वीज वितरण यंत्रणा स्थिर ठेवण्यासाठी जगभरात पंप स्टोरेज तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. या तंत्रज्ञानामुळे मागणीच्या उच्च काळात स्वच्छ, नवीकरणीय ऊर्जा उपलब्ध करून देणे शक्य होते, असेही त्यांनी नमूद केले.

प्रस्तावित प्रकल्पाची क्षमता तीन हजार मेगावॅट आहे. एवढीच वीज कोळशापासून निर्माण केल्यास होणारे प्रदूषण भरून काढण्यासाठी २८ कोटी झाडांची आवश्यकता भासेल, असा दावा फडणवीस यांनी केला. पंप स्टोरेज प्रकल्पाला विरोध करून कोळशाच्या विजेवर अवलंबून राहिल्यास प्रदूषण कमी करण्याचे आव्ह- ान अधिक गंभीर होईल, असे ते म्हणाले. प्रकल्पांतर्गत ९० हजार झाडे लावण्यात येत असून, प्रकल्पासाठी वापरलेल्या जमि नीच्या दुप्पट क्षेत्र वनविभागाला वनीकरणासाठी देण्यात आले आहे. याशिवाय प्रकल्पाच्या ठिकाणी आणखी ६० हजार झाडे लावण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

बॅटरी स्टोरेज प्रकल्पांच्या तु- लनेत पंप स्टोरेज तंत्रज्ञान दीर्घकाळ उपयोगी ठरू शकते, असे सांगताना फडणवीस यांनी बॅटरीचे आयुष्य साधारण २५ वर्षे, तर पंप स्टोरेज प्रकल्पाचे आयुष्य सुमारे ८० वर्षे असल्याचे नमूद केले. बॅटऱ्यांसाठी चीनमधून आयात करावी लागते, तर पंप स्टोरेजसाठी आवश्यक तंत्रज्ञान भारतातच उपलब्ध आहे, असा दावाही त्यांनी केला. या प्रकल्पामुळे पुढील शंभर वर्षांच्या कालावधीत पर्यावरणाची हानी टाळण्यास मदत होईल आणि सध्या दिसणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय परिणामांपेक्षा दीर्घकालीन लाभ कितीतरी पटींनी अधिक असतील, असे त्यांनी सांगितले. धरण बांधताना जलाशयासाठी वनजमीन वापरावी लागते, त्याच धर्तीवर पंप स्टोरेज प्रकल्पात जलसाठा निर्माण होणार असल्याने वनजमीन देण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. पंप स्टोरेज प्रकल्पासाठी कोणतीही जागा निवडता येत नाही. त्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य ठिकाणे शोधावी लागतात. पश्चिम घाटातील काही ठिकाणे या दृष्टीने अधिक अनुकूल असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र सरकारनेही पंप स्टोरेज प्रकल्पांचा समावेश हरित प्रकल्पांमध्ये केला असल्याचे नमूद करत, संपूर्ण आयुष्यकालाचा विचार केल्यास हे प्रकल्प पर्यावरणपूरक आणि कार्बन शोषणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात, असे फडणवीस म्हणाले.

# महाराष्ट्राला ५ टीएमसी पाणी मिळणार; नर्मदा जलविवाद निवाड्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या मागणीवर जलशक्ती मंत्र्यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



**मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मागणीवर नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या पुनर्विचार समितीच्या बैठकीत सूचना**

मुंबई : राज्यातील सध्याची दुष्काळ परिस्थिती आणि आगामी पाणीसंकट (थर- ींशी) पाहाता नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या उच्चस्तरीय पुनर्विचार समितीच्या आजच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यात, नर्मदा जलविवाद निवाड्यानुसार महाराष्ट्राच्या वाट्याचे उकाई धरणातील पाच टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या सूचना नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या पुनर्विचार समितीच्या बैठकीत देण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्ींशिपवीर ऋव- परींळी) यांनी बैठकीत महाराष्ट्राची बाजू मांडून या पाण्याची मागणी केली. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांनी यावर तात्काळ निर्देश दिले.

नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या उच्चस्तरीय पुनर्विचार समितीची बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. दूरदृष्यप्रणालीद्वारे झालेल्या या बैठकीसाठी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, मध्य प्रद- ेशचे मुख्यमंत्री मोहनलाल यादव, राजस्थ- ानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा हे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीम ध्ये महाराष्ट्राच्या नर्मदा प्रकल्प दायित्वाच्या अनुषंगाने कार्यवाहीची माहिती दिली. नर्मदा जलविवाद निवाड्यात महाराष्ट्राला दहा टीएम सी पाणी मंजूर आहे. त्यापैकी पाच टीएमसी पाणी वळण कालव्याद्वारे मिळणार असून, उर्वरित पाच टीएमसी पाणी उकाई धरणा- तून देण्याचे ठरले होते. त्यानुसार मान्यता देण्याची मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री आणि गुजरातच्या मुख्यमंत्र्यांकडे केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासम वेत यापूर्वी झालेल्या बैठकीमध्ये नियम नानुसार पाणी महाराष्ट्राला देण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार उकाई धरणा- तून महाराष्ट्राला पाणी मिळणे अपेक्षित आहे, अशी भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडलेल्या भूमिकेनुसार महाराष्ट्राला त्याच्या वाट्याचे पाणी उपलब्ध व्हावे , असे केंद्रीय जनशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा व जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले उपस्थित होते.

# अधिकाऱ्यांच्या बदल्या ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करा; निवडणूक आयोगाचे पाच राज्यांना कडक आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातील पाच राज्यांम ध्ये आगामी २०२७ मध्ये पार पडणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पूर्वतयारीला केंद्रीय निवडणूक आयोगाने आतापासूनच वेग दिला आहे. गोवा, मणिपूर, पंजाब, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड या पाच राज्यांमधील निवडणुकीशी थेट संबंधित असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नवीन नियुक्त्यांबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाने अत्यंत कडक आणि सविस्तर आदेश जारी केले आहेत.

संबंधित पाचही राज्यांचे मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठवलेल्या पत्रात, अधिकाऱ्यांच्या बदल्यांची ही सर्व प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून त्याचा अनुपालन अहवाल ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आयोगाकडे सादर करण्याचे थेट निर्देश देण्यात आले आ- हेत. निवडणूक आयोगाने जारी केलेल्या पत्रानुसार, या पाच राज्यांतील विद्यमान विधानसभांचा कार्यकाळ पुढीलप्रमाणे संपत आहे:

मणिपूर: १३ मार्च २०२७
गोवा: १४ मार्च २०२७
पंजाब: १६ मार्च २०२७
उत्तराखंड: २८ मार्च २०२७
उत्तर प्रदेश: २२ मे २०२७

पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, निवडणुकीच्या कामाशी थेट जोडलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला खालील परिस्थितीत सध्याच्या महसूल जिल्ह्यात कायम ठेवले जाणार नाही, जर संबंधित अधिकारी हा त्याच जिल्ह्या- चा गृहजिल्हा रहिवासी असेल गेल्या ४ वर्षांच्या कालावधीत त्या जिल्ह्यात ३ वर्षे पूर्ण केली असल्यास, अथवा गोवा, मणिपूर, पंजाब आणि उत्तराखंडसाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत आणि उत्तर प्रदेशसाठी ३१ मे २०२७ पर्यंत ३ वर्षे पूर्ण होणार असल्यास. या ३ वर्षांची मोजणी करताना जिल्ह्यातील पदोन्नतीचा कालावधी ग्राह्य धरला जाईल. मात्र, राज्य मुख्यालय येथील सेवेचा कालावधी (जरी ते त्याच जिल्ह्यात असले तरी) यात मोजला जाणार नाही. तसेच बदली होणाऱ्या अधिकाऱ्यांना राज्य मुख्यालयात नियुक्ती देता येईल.

आयोगाने आपल्या आदेशात विशेषतः बजावले आहे की, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, तसेच पोलीस निरीक्षक/उपनिरीक्षक किंवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना मागील विधानसभा निवडणुकीत किंवा त्यानंतर पार पडलेल्या कोणत्याही पोटनिवडणुकीत ज्या मतदारसंघ किंवा जिल्ह्यात नेमण्यात आले होते, तिथे पुन्हा पोस्टिंग दिली जाऊ नये. निवडणूक अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी २६ जून २०२३ च्या परिपत्रकातील नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देत आयोगाने स्पष्ट केले की, केडरसाठी निश्चित असलेल्या पदांवर केवळ केडर अधिकाऱ्यांचीच नेमणूक केली जावी. या नियमाला कोणताही अपवाद असणार नाही. हाच नियम पोलीस दलातील केडर पदांसाठीही तंतोतंत लागू राहील, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

# जलसंपदा विभागाचा ३९ हजार ७२२ पदांचा आकृतीबंध मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या जलसंपदा विभागासाठी वाढीव ११० सिंचन शाखांसह, ३९ हजार ७२२ पदांच्या आकृतीबंधास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नदीजोड प्रकल्पासाठी मुख्य अभियंता (स्थापत्य) या पदासह, पाच म हाडळांकरिता भूसंपादन, कृषि, सामाजिक बदल तज्ज्ञांची कार्यकारी अभियंता दर्जाची पंधरा पदे, याशिवाय सिंचन सहायक असे नवीन पद निम र्ण करण्यास मंजुरी या बैठकीत देण्यात आली. नदीजोड प्रकल्प मुख्य अभियंता (स्थापत्य) यांचे पद थेट शासन नियंत्रणाखाली राहील.

राज्यात २०१६ अखेरपर्यंत सिंचनाखाली असलेल्या ४५ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये १३ लाख हेक्टरची वाढ झाली आहे. त्यामुळे २०२५ अखेरपर्यंत ५८ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. या वाढीव क्षेत्राच्या व्यवस्थापनाकरिता वाढीव ११० सिंचन शाखांसह एकूण १४५० सिंचन शाखा कार्यालयासाठी पदनिर्मितीस मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास म हामंडळ-पुणे, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ - नागपूर, तापी पाटबंधारे विकास महामंडळ- जळगाव, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ- ठाणे आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ-छत्रपती संभाजीनगर या पाच म हामंडळांसाठी भूसंपादन तज्ज्ञ, कृषिविषयक तज्ज्ञ, सामाजिक बदल तज्ज्ञ असे तीन नवीन संवर्ग निम र्ण करण्यास आणि त्यासाठी एकूण १५ कार्यकारी अभियंता दर्जाच्या पदांची निर्मिती करण्यास मंजुरी देण्यात आली. याशिवाय क्षेत्रिय कार्यालयांमधील दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व मोजणीदार या (एस-६ वेतनस्तर) पदांच्या कामाचे स्वरूप विचारात घेऊन, त्यांचे एकत्रीकरण करून सिंचन सहायक हा नवीन संवर्ग निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

जलसंपदा विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यप्रकारानुसार २००३ मध्ये एकूण ४५ हजार २९७ पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला होता. दरम्यान जलसंपदा विभागाकडील ३९३१ नियमित पदे जलसंधारण विभागाकडे वर्ग करण्यात आली. यानंतर सचिव (लाक्षेवि) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पदांचा आढावा घेऊन हा आकृतीबंध तयार केला. या सुधारीत आकृतीबंधाच्या प्रस्ता- वास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली.

त्यानुसार विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांकरीता एकूण ३१ हजार ५४१ नियमित पदे (२१५५९+ मृत संवर्गातील कार्यरत ९९८२), व बाह्ययंत्रणेद्वारे ८ हजार १८१ पदांच्या मनुष्यबळ सेवा अशा एकूण ३९ हजार ७२२ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली. या आकृतीबंधात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कार्यालयासाठी एकूण ४३ (२३ नियमित + २० कंत्राटी) पदांचा समावेश आहे. मृत संवर्गातील ९९८२ पदांपैकी १६७१ पदे जसजशी रिक्त होतील तशी कायम स्वरूपी रद्द होतील. यातील ८३११ पदे (पद- ोन्नती, सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती, राजीनामा,मृत्यू व अन्य कोणत्याही कारणांमुळे) जसजशी रिक्त होतील तशी बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यात येतील. मृत संवर्गातील ८ हजार ३११ पदांसह, बाह्य यंत्रणेद्व- ारे कंत्राटी स्वरुपात घेण्यात येणाऱ्या ८ हजार १८१ अशा एकूण १६ हजार ४९२ पदांच्या कमाल मर्यादेत बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली. अनुकंपा धोरण, लाडपागे समितीच्या शिफारशीनुसार गट-क व गट-ड मधील मृत घोषित केलेल्या संवर्गातील बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवेतील पदे आवश्यकतेनुसार पुनर्जिवित करण्याचे अधिकार विभागास राहणार आहे. तथापि, अशा वेळी बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवेतील पदे त्या प्रमाणात कमी होतील.

या आकृतीबंधासह, कामकाजामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने व खासगी क्षेत्रा- तील अनुभवी विशेषज्ञ यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याच्या उद्देशाने मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, (मुख्य अभियंता दर्जा) (कंत्राटी) यांच्या नियंत्रणाखाली तंत्रज्ञान कक्ष आणि क्षेत्रिय (पान २ वर.....)

**मतमोजणीत संमिश्र चित्र**

**पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक चुरस**

# विधान परिषदेच्या पाच जागांसाठी चुरशीची लढत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील पाच जागांच्या निवडणुकीच्या मतमोजणीत महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांमध्ये चुरशीची लढत पाहायला मि ळत आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघात महायुतीचे सुधाकर कोहळे यांनी पहिल्या फेरीत निसटती आघाडी घेतली, तर म राठवाडा पदवीधर मतदारसंघात प्रताप- सिंह पाटील हे सतीश चव्हाण यांच्यापेक्षा तीन हजार मतांनी पुढे होते. अमरावती शिक्षक मतदारसंघात महायुतीचे किरण सरनाईक आघाडीवर असून काँग्रेसच्या अदिती पोहरे यांना पहिल्या पसंतीची १ हजार ३१९ मते मिळाली. पुणे पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीच्या हर्षदा देशमुख यांनी पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये आघाडी घेतली आहे.

शुक्रवारी मतदान झाल्यानंतर मंगळवारी सकाळी आठ वाजल्यापासून पाचही मतदारसंघांतील मतमोजणीला सुरुवात झाली. नागपूर पदवीधर म तदारसंघात भाजप आणि काँग्रेसमध्ये अटीतटीची लढत अपेक्षित असताना पहिल्या फेरीत सुधाकर कोहळे यांनी निसटती आघाडी घेतली. या फेरीत सुमारे ८४ हजार मतपत्रिकांची मोजणी अपेक्षित असून, वृत्त प्रसिद्ध होईपर्यंत मतमोजणी सुरू होती. त्यामुळे अंतिम निकालाबाबत स्पष्टता आलेली नव्हती.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघात प्रतापसिंह पाटील यांनी सतीश चव्हाण यांच्यावर तीन हजार मतांची आघाडी घेतल्याची माहिती समोर आली. या मतदारसंघातील लढतीकडेही राजकीय



वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अमरा- वती शिक्षक मतदारसंघात महायुतीचे किरण सरनाईक यांनी पहिल्या फेरीतील मतमोजणीत आघाडी घेतली. उप- लब्ध आकडेवारीनुसार सरनाईक यांना ३ हजार ९०३ मते मिळाली. शिवसेनेतील बंडखोर उमेदवार श्रीकांत देशपांडे यांना २ हजार २०९, अपक्ष सुरेश देवकर यांना १ हजार ५८२, काँग्रेसच्या अदिती पो- हरे यांना १ हजार ३१९, तर उबाठाचे दत्तात्रय लहाने यांना १ हजार १६९ मते मिळाली. भाजपच्या बंडखोर उमेदव- ार संगीता शिंदे यांना ६९८, तर शेखर भोयर यांना ४३२ मते मिळाली. त्यामुळे काँग्रेसच्या उमेदवाराला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागल्याचे चित्र होते. पुणे पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीच्या हर्षदा देशमुख आणि स्मिता जाधव यांच्यात चुरस पहायला मिळत आहे. पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये हर्षदा देशमुख आघाडीवर होत्या. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये आघाडीवर दिसून आले.

अद्याप मतमोजणी सुरू असल्याने आकड्यांमध्ये बदल होण्याची शक्यता असून अंतिम निकालानंतरच महायुती आणि महाविकास आघाडीचे नेमके यश स्पष्ट होणार आहे.

## संपादकीय....

### मुख्यमंत्र्यांचा इशारा

राज्यातील दुष्काळग्रस्त सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाला मंत्रिमंडळाने मंगळवारी निधीसह मंजुरी दिली. येत्या दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यांत रक्कम जमा होण्यास सुरुवात होईल आणि कोणत्याही परिस्थितीत दिवाळीपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांत पैसे पोहोचविण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे नुकतेच मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्याचवेळी, मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून शेतकऱ्यांना दमदाटी करून कर्जवसुली करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पा-वले उचलण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांची तक्रार तातडीने नोंदवून फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्दे श सर्व जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. नांदेडमध्ये मायक्रोफायनान्स कंपनीच्या कर्जवसुलीशी संबंधित घडलेल्या घटनेमुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास दिल्याची तक्रार प्राप्त होताच ती नोंदवून घेऊन संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. मायक्रोफायनान्स कंपन्यांनी सक्तीने किंवा दमदाटी करून वसुली करू नये, यासाठी रिझर्व्ह बँकेला (आरबीआय) पत्र पाठविण्यात येणार आहे. अशा प्रकारे बळाचा वापर करणाऱ्या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करून गुन्हे दाखल केले जाणार आहेत.

## जलसंपदा विभागाचा ३९ हजार ७२२ पदांचा आकृतीबंध मंजूर

(क्एत १ इगढत..) स्तरावरील महामंडळे तसेच महासंचालक संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा, मेरी, नाशिक कार्यालयांमध्ये तंत्रज्ञान समन्वय कक्ष निर्मिती करण्यात येत आहे. विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांकडील कामकाजाचे बदलते स्वरूप लक्षात घेऊन राज्य धरण सुरक्षितता संघटना, राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समिती, विद्युत संघटना, यांत्रिकी संघटना, राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र यांच्या पुनर्रचनेस मान्यता देण्यात आली. याशिवाय पाणीतंटा लवाद विषयक बाबी व उर्वरित गोदावरी, नर्मदा व तापी खोऱ्यांचेही लवादविषयक बाबींचे कामकाज व भविष्यात स्थापन होणाऱ्या इतर लवादांचे विधिविषयक कामकाज अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद विशेष कक्ष, पुणे-१ या कार्यालयाकडे सोपवून या कार्यालयाचे नाव अधीक्षक अभियंता, आंतरराज्य नदी जललवाद कार्यालय, पुणे असे तर महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा, मेरी, नाशिक अंतर्गत मुख्य अभियंता, जलविज्ञान व नियोजन या कार्यालयाचे नाव मुख्य अभियंता, जलविज्ञान व वातावरणीय बदल असे करण्यात येणार आहे.

# विकसित भारतासाठी किफायतशीर अत्याधुनिक तंत्रज्ञान, भक्कम संशोधन आणि विकास आणि लवचिक पुरवठा साखळी आवश्यक : राजनाथ सिंह

## पुरवठा साखळी व्यवस्थापन ही धोरणात्मक गरज : महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान, उद्योग आणि संसाधने लक्षात घेऊन कालबद्ध आराखडा तयार करण्याचे संरक्षण मंत्र्यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण क्षेत्रात 'आत्मनिर्भरता २.०' चे आवाहन केले आहे. त्यांनी 'विकसित भारत२०४७' च्या संकल्पनेत योगदान देण्यासाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि तांत्रिक श्रेष्ठत्व प्राप्त करण्याच्या दृष्टीने उच्च दर्जाच्या, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास करणे, संशोधन आणि विकास बळकट करण्यावर आणि लवचिक पुरवठा साखळी तयार करण्यावर भर दिला. ते २६ ऑक्टोबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथे भारतीय नौदलाच्या 'स्वावलंबन' या नवोन्मेष आणि स्वदेशीकरण चर्चासत्राच्या पाचव्या आवृत्तीला संबोधित करत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली प्राप्त केलेल्या आत्मनिर्भरतेच्या पहिल्या टप्प्यातील यशाचा पाया अधिक मजबूत करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. भविष्याभिमुख दृष्टिकोन आणि वैज्ञानिक शिस्त असलेले संरक्षण नवसंशोधक अधिक आव्हानात्मक तांत्रिक उद्दिष्टे गाठण्यात 'इम्पॅक्ट प्लेयर्स'ची भूमिका बजावू शकतात, असे त्यांनी अधोरेखित केले.






गेल्या दशकात संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेने देशाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण भरारीवर राजनाथ सिंह यांनी भर दिला. आतापर्यंत झालेल्या प्रगतीने पुढील टप्प्यासाठी एक मजबूत पाया तयार केला आहे, ज्यामध्ये प्रगत तंत्रज्ञान आणि साध्य करायला कठीण मानल्या जाणाऱ्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. त्यांनी स्वदेशी बनावटीची उत्पादने किफायतशीर, कार्याच्या दृष्टीने सरस आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

संरक्षण मंत्र्यांनी पुरवठा साखळी व्यवस्थापन म्हणजे केवळ एक तांत्रिक मुद्दा नसून, राष्ट्रीय सुरक्षेशी थेट जोडलेली एक धोरणात्मक गरज असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी प्रत्येक घटकात आत्म निर्भरता मिळवण्यासाठी स्पष्ट कालमर्यादा निश्चित करणाऱ्या, विकसित करावयाचे तंत्रज्ञान व नवोन्मेषाला चालना देण-ारे उद्योग निवडणाऱ्या आणि ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या संसाधनांची रूपरेषा ठरवणाऱ्या एका गतिमान आराखड्याच्या निर्मितीचे आवाहन केले. दुर्मिळ खनिजांसारख्या विशिष्ट कच्च्या मालाची देशांतर्गत मर्यादित उपलब्धता आणि देशात विशिष्ट तंत्रज्ञानाचा अभाव यांमुळे पुरवठा साखळीतील अवलंबित्व निर्माण होते. जोपर्यंत योग्य पर्याय विकसित होत नाहीत किंवा देशांतर्गत संसाधने उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत काही काळ बाह्य अवलंबित्व कायम राहू शकते, परंतु स्वदेशीकरणासाठी अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांना प्राधान्य देण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

राजनाथ सिंह यांनी पुरवठा मार्गातील संभाव्य अडथळ्यांना तोंड देण्याची गरज अधोरेखित केली. आपत्तीची वाट न पाहता राखीव साठा आणि स्थानिक उत्पादनक्षमतेचे मूल्यमापन करून आधीपासूनच सज्ज राहण्यावर त्यांनी भर दिला.

संरक्षण मंत्र्यांनी यावेळी, संशोधनात समाविष्ट असलेल्या धोक्यांवरही भाष्य केले आणि अपयशाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा असे आवाहनही केले.

iDEX च्या माध्यमातून झालेल्या प्रगतीची प्रशंसा करत, भारतीय स्टार्ट अप्स आणि एमएसएमई उद्योगांनी नौदल प्रणाली, सेन्सर्स, संपर्क व्यवस्था आणि इतर महत्वाच्या क्षेत्रात कार्यान्वयनात येणाऱ्या आव्हानांचे नवोन्मेषासाठीच्या संधीत रूपांतर करण्यासाठी विकसित केलेल्या उपायांचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

हिंद महासागर परिसरात बदलत असलेल्या परिस्थितीनुसार, नौदलाच्या जहाजांच्या मागणीत सातत्याने वाढ होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. आणि त्यांची बांधणी, भांडवल-प्रणित असल्याने, देशांतर्गत उत्पादन वाढवतांनाच, खर्च कमी करण्याच्या पद्धती शोधून काढण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आत्मनिर्भरतेच्या पुढच्या टप्प्यात, केवळ भारतीय उत्पादनांच्या संख्येवरच भर द्यायला नको, तर तेवढेच प्राधान्य गुणवत्ता कार्यक्षमता आणि परवडणाऱ्या दरांनाही द्यायला हवे, असेही राजनाथ सिंह म्हणाले. आत्मनिर्भरतेमुळे राष्ट्रीय सुरक्षा मजबूत व्हावी, त्यासोबतच आर्थिक दृष्ट्या सुद्धा ते लवचिक असले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

देशातील प्रतिभावंत युवाशक्तीच्या आकांक्षांच्या पूर्ततेच्या मार्गात निधीची कमतरता अडथळा ठरू नये, याची आमच्या सरकारने खातरजमा केली आहे. १९०० कोटी रुपयांहून अधिक मूल्याचे नौदल करार हे आमच्या याच प्रयत्नांना भरीव यश मिळत असल्याचे निदर्शक आहेत.असे राजनाथ सिंह म्हणाले. स्वदेशीकरणासाठी व्यापक दृष्टिकोन स्वीकारण्याच्या दृष्टीने, नागरी आणि लष्करी अशा दोन्ही गरजा पूर्ण करू शकणाऱ्या तंत्रज्ञानाला प्राधान्य देण्यासाठी 'दुहेरी तंत्रज्ञानाचा कृती आराखडा' विकसित करण्याचे आवाहन त्यांनी केले.

क्वांटम तंत्रज्ञान, युद्धकार्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि मानवरहित प्रणाली यांसारख्या उदयोन्मुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संरक्षण दल, उद्योग क्षेत्र आणि शैक्षणिक संशोधन संस्थांम ध्ये होत असलेल्या सहकार्याचे संरक्षण मंत्र्यांनी कौतुक केले.

यावेळी नौदल प्रमुख, ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी आपल्या भाषणात, स्वावलंबन या मोहिमेचा २०२२ पासूनचा विकास अधोरेखित केला. त्यात त्यांनी नौदल विशिष्ट ळऊएद आव्हाने आता २० वरुन २२९ पर्यंत आली असून संपूर्ण संरक्षण क्षेत्रातील ळऊएद आव्हानांचा वाटा सुमारे ३५% इतका असल्याचे नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र, स्वयंपूर्ण प्रणाली, रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिम त्ता, स्वायत्त प्रणाली, रोबोटिक्स आणि क्वांटम सेन्सिंग तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे निर्माण होणाऱ्या संधींवर भर देताना, नौदल प्रमुखांनी नव्या कल्पनांना प्रत्यक्ष कार्यान्वित करता येण्याजोग्या क्षमतांम ध्ये रूपांतर करण्याची गरज अधोरेखित केली.

यावेळी संरक्षण मंत्र्यांनी स्टार्टअप्स आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे १०० हून अधिक स्टॉल्स असलेल्या तंत्रज्ञान प्रदर्शनाला भेट दिली तसेच नौदलासमोरील आव्हाने व समस्यांवरील उपाय शोधण्यासाठी कार्यरत असलेल्या नवोन्मेषकांशी संवाद साधला. नौदलाच्या गरजांनुसार कार्यरत असलेल्या स्टार्टअप्स आणि एमएसएमईंनी त्यांची कार्यक्षमता विकसित करण्यासाठी प्रगतिपथावर असलेले विशेष तंत्रज्ञान यावेळी संरक्षण मंत्र्यांना दाखवले. तर, यशोगाथा विभागात भारतीय नौदलात समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू असलेल्या विकसित उत्पादनांचे प्रदर्शन करण्यात आले.

स्वायत्त सागरी प्लॅटफॉर्म, युद्धकार्यासाठी क्वांटम तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, सतत टेहळणी, सक्षम आणि विश्वासार्ह दिशादर्शन, प्रगत संपर्क प्रणाली आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञान यांसारख्या उपायांमुळे, प्रदर्शनातील स्वदेशी तंत्रज्ञान विकासाची व्यापक व्याप्ती अधोरेखित झाली आहे.

# ग्रामीण कुटुंबांना वर्षभरात १२५ दिवसांच्या रोजगाराची वैधानिक हमी

**महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अंम लबजावणीसाठी राज्य शासनाचे नवीन दिशानिर्देश; कामांची निवड, मोजमाप, देयके व प्रशासकीय प्रक्रियेत स्पष्टता**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : ग्रामीण भागातील कुटुंबांना अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात नवीन दिशानिर्देश जारी केले आ-हेत. शासन निर्णय दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ नुसार, कामांची निवड, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, जिओ टॅगिंग, हजेरीपत्रक, कामांचे मोजमाप आणि देयके अदा करण्यासंदर्भातील कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली आहे.

**वर्षभरात १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी**

विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) कायदा, २०२५ हा केंद्रीय कायदा १ जुलै २०२६ पासून देशभरात लागू झाला आहे. या कायद्यानुसार ग्रामीण कुटुंबांना वर्षभरात १२५ दिवसांच्या अकुशल रोजगाराची वैधानिक हमी देण्यात आली आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या असून, राज्यात संबंधित योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**केंद्र व राज्याच्या निधीचा समन्वय**

नवीन व्यवस्थेनुसार अकुशल, कुशल आणि प्रशासकीय खर्चासाठी केंद्र व राज्य शासनाचा निधी अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात ठेवण्यात आला आहे. या निधी व्यवस्थेसाठी केंद्र शासनाकडून मानक वाटप प्रणालीचा अवलंब करण्यात येतो. राज्य शासनाने केंद्रीय अर्थसहाय्य आणि राज्याचा समरूप हिस्सा यांच्या आधारे 'म हाराष्ट्र राज्य व्ही.बी.-जी राम जी निधी स्थापन केला आहे. रोजगार हमी निधी आणि या निधीच्या माध्यमातून योजनेअंतर्गत कामांची अंमलबजावणी केली जात आहे.

**कामांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया स्पष्ट**

शासन निर्णयानुसार, योजनेअंतर्गत अनुज्ञेय कामे निश्चित करणे, कामांची निवड करण्याची पद्धत, अधिकार व प्रक्रिया, कामांचे मापदंड, अंदाजपत्रकीय किंमत तसेच प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची कार्यपद्धती याबाबत स्पष्टता देण्यात आली आहे. याशिवाय कामांचे जिओ टॅगिंग, हजेरीपत्रक निर्गमित करणे, भरणे व प्रमाणित करणे, आवश्यक साहित्य उपलब्ध करून घेणे आणि पूर्ण झालेल्या कामांचे मोजमाप घेणे या बाबींचाही समावेश आहे. कामांचे मोजमाप मोजमाप पुस्तिकेत नोंदवून ते प्रमाणित करणे, मोजमापानुसार देयके तयार करून ऑनलाइन सादर करणे, देयकांना मान्यता देणे आणि त्यानंतर देयके अदा करणे या प्रक्रियांचाही दिशानिर्देशांत समावेश आहे.

**पूर्वीचे आदेश आवश्यक त्या फ ेरफारांसह लागू**

नवीन कायद्याच्या अंम लबजावणीदरम्यान एखाद्या बाबीसंदर्भात केंद्रीय किंवा राज्य कायद्यात विशिष्ट तरतूद उपलब्ध असल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाचे संबंधित आदेश किंवा निर्देश लागू असल्यास त्यांचे पालन करण्यात येईल. ज्या बाबींसंदर्भात कायद्यात किंवा शासनाच्या आदेशांत विशिष्ट तरतूद उपलब्ध नाही, अशा ठिकाणी यापूर्वी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी जारी करण्यात आलेले शासन निर्णय, परिपत्रके, आदेश आणि अधिसूचना आवश्यक त्या फेरफारांसह लागू राहतील. मात्र, हे आदेश नवीन कायदे व त्यानुसार अधिसूचित नियम किंवा विनियमांशी विसंगत असल्यास विसंगतीच्या मर्यादेत निष्प्रभ ठरतील. योजनेची अंम लबजावणी करताना उद्भवणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी आवश्यकतेनुसार राज्य शासनाकडून स्वतंत्र धोरणात्मक निर्णय व आदेश जारी करण्यात येणार आहेत.

**क्षेत्रीय यंत्रणांना मार्गदर्शन**

योजनेची अंमलबजावणी सुरळीत व्हावी आणि धोरणात्मक निर्णयांच्या अभावामुळे कामांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने हे दिशानिर्देश जारी करण्यात आले आहेत. या शासन निर्णयाची अंमलबजावणी राज्यातील संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच रोजगार हमी योजनेशी संबंधित इतर क्षेत्रीय यंत्रणांनी करावयाची आहे.

# भारताचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन देण्यासाठी गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसकडून 'दी आभार कलेक्शन'ला चालना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस ऋशच् भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा दर्शवणाऱ्या निवडक भेटवस्तू आणि भेटवस्तू संच उपलब्ध करून देणाऱ्या 'दी आभार कलेक्शन' या विशेष डिजिटल विक्री मंचाला प्रोत्साहन देत आहे. या संग्रहात 'एक जिल्हा, एक उत्पादन' उपक्रमांतर्गत येणाऱ्या आणि भौगोलिक मानांकन (जीआय) प्राप्त उत्पादनांचा समावेश आहे. यामुळे सरकारी खरेदीदारांना विविध प्रदेशांतील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने सहज उपलब्ध होतात. त्याचबरोबर कारागीर, विणकर, ग्रामीण उद्योजक आणि महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांना प्रोत्साहन व पाठबळ मिळते.

या संग्रहात १० राज्ये आणि केंद्रीय हातम ाग आणि हस्तकला विक्री दालनांमधील एकूण २९४ उत्पादनांचा समावेश आहे. यामध्ये सेंट्रल कॉटेज इंडस्ट्रीज एम्पोरियमचे 'कॉटेज', खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे 'खादी इंडिया', गुजरातचे 'गर्वी गुर्जरी', हिमाचल प्रदेशचे 'हिमक्राफ्ट्स', झारखंडचे 'झारक्राफ्ट', कर्नाटकचे 'कावेरी', मध्य प्रदेशचे 'मृगनयनी', महाराष्ट्राचे 'मऱ्हाठी' , ईशान्य भारताचे 'पूर्वश्री' आणि तमिळनाडूचे 'पूमपुहार' या विक्री दालनांतील उत्पादनांचा समावेश आहे.

आणखी सात सरकारी विक्री दालने आणि संस्थांची विक्रेता नोंदणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांनाही 'आभार कलेक्शन' या डिजिटल विक्री मंचावर आपली निवडक उत्पादने उपलब्ध करून देता येतील. यामध्ये कॉफी बोर्ड, पश्चिम बंगालच्या मंजुषा आणि बिस्वा बांगला, जम्मू आणि काश्मीर हँडलूम अँड हँडिक्राफ्ट्स मार्केटिंग कॉर्पोरेशन लिमिटेड, नागालँडच्या मेराकाई, ओदिशाच्या उत्कलिका आणि मणिपूरच्या पंथोईबी यांचा समावेश आहे. या संस्थांच्या उत्पादनांचा समावेश झाल्यानंतर 'आभार कलेक्शन'मधील विविध प्रदेशांचे प्रतिनिधित्व वाढेल आणि उत्पादनांची विविधताही अधिक समृद्ध होईल.

या संग्रहात हस्तकला, हातमाग, वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ, खाद्यपदार्थांची विविध उत्पादने आणि वैयक्तिक निगा राखण्यासाठीच्या वस्तूंचा समावेश आहे. अधिकृत समारंभ, परिषदा, राज्यस्तरीय कार्यक्रम, परदेशी शिष्टमंडळांचे स्वागत, कर्मचाऱ्यांचा सन्मान, निवृत्ती समारंभ आणि सण-उत्सव अशा विविध प्रसंगांसाठी सरकारी खरेदीदारांना या संग्रहातून भेटवस्तूंचे अनेक पर्याय उपलब्ध होतात.

**'आभार कलेक्शन'मध्ये १० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील हातम ाग तसेच हस्तकला वस्तू विक्री केंद्राच्या २९४ उत्पादनांचा समावेश**

'आभार कलेक्शन २०२६' या उपक्रम ाच्या शुभारंभप्रसंगी जेएमचे (GeM) मुख्य कार्यकारी अधिकारी मिहीर कुमार म्हणा-ले, 'आभार कलेक्शन' हा स्वदेशी कला आणि हस्तकलेला अधिक प्रसिद्धी मिळवून देण्याच्या, भारतीय वारसा आणि संस्कृतीचे समृद्ध वैभव जगासमोर मांडण्याच्या आणि केंद्र तसेच राज्यांच्या हातमाग आणि हस्तकला विक्री दालनांच्या माध्यमातून वंचित विक्रेता गटांना सक्षम बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

जुलै २०२४ मध्ये 'दी आभार कलेक्शन' सुरू करण्यामागील उद्देश आणि सध्याच्या मोहिमेची माहिती देताना, जेएमचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सामाजिक समावेशनाची जबाबदारी सांभाळणारे अजित बी. चव्हाण म्हणाले, जेएमवरील 'व्होकल फॉर लोकल' या विशेष डिजिटल विक्री मंचाच्या माध्यमातून देशातील कारागिरांना सार्वजनिक खरेदी प्रक्रियेशी जोडणे आणि त्यांना एक सक्षम बाजारपेठ उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

ते पुढे म्हणाले की, या संग्रहामुळे मंत्रालये, विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि इतर सरकारी खरेदीदारांना भेटवस्तूंची गरज पूर्ण करताना स्वदेशी उत्पादनांची खरेदी करणे आणि स्थानिक लोकांच्या उपजीविकेला पाठबळ देणे शक्य होते.

सरकारी खरेदीदार, https://gem.gov.in/abhar(https://gem.gov.in/abhar?utmšsource=chatgpt.com) या संकेतस्थळाला भेट देऊन 'आभार कलेक्शन' पाहू शकतात. तसेच, 'व्होकल फॉर लोकल' (VocalForLocal) अंतर्गत भेटवस्तू संचांची खरेदी करून भारताचा सांस्कृतिक वारसा जपण्यास आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देण्यास हातभार लावू शकतात.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केलेल्या महावस्त्रांचा सेल

## भाविकांना अल्प दरात महावस्त्रे उपलब्ध; २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर दरम्यान सेल चे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या तसेच परिवार देवतांच्या चरणी भक्तिभावाने अर्पण केलेली व परिधान केलेली महावस्त्रे भाविक व नागरिकांना अल्प दरात उपलब्ध करून देण्यासाठी महावस्त्र सेल आयोजित करण्यात आला आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी भक्तिभावाने अर्पण केलेल्या या महावस्त्रांना धार्मिक व भावनिक महत्त्व आहे. ही महावस्त्रे प्रसादस्वरूपात आपल्या घरी नेण्याची विशेष संधी या सेलच्या माध्यमातून भाविकांना उपलब्ध झाली आहे.





या सेलमध्ये साड्या, ब्लाऊज पिस, चोळीखण, उपरणे, शाल, शेला, धोतर, सोहळे, लुंगी, टॉवेल, टोपी, नॅपकीन आदी विविध प्रकारची महावस्त्रे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

महावस्त्रांच्या किंमती अत्यंत माफक ठेवण्यात आल्या आहेत. उपलब्ध साड्या ₹१०५ ते ₹७,१००, शाल ₹१०५ ते ₹३१५, शेला ₹१०५ ते ₹१,०५०, सोहळे व उपरणे ₹२१० ते ₹३,१००, धोतर ₹२१० ते ₹१,०५० या दरात उपलब्ध आहेत. तसेच ब्लाऊज पिस, टॉवेल, टोपी, नॅपकीन आदी वस्तू ₹१०५ पासून, तर चोळीखण व लुंगी प्रत्येकी ₹२१० दराने उपलब्ध आहेत.

या महासेलमध्ये विविध प्रकारच्या महावस्त्रांचा मोठ्या प्रमाणात साठा उपलब्ध असून, त्याची एकूण किंमत सुमारे ₹१८ लाख इतकी आहे. भाविकांच्या सोयीसाठी महावस्त्राचे प्रकार व दरानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे.

श्री विठ्ठल, श्री रुक्मिणी माता तसेच परिवार देवतांच्या चरणी भाविकांकडून मोठ्या प्रमाणात महावस्त्रे अर्पण केली जातात. प्राप्त होणाऱ्या महावस्त्रांसाठी मंदिर समितीच्या वतीने स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला असून, त्याची जबाबदारी सहाय्यक विभाग प्रमुख एकनाथ दर्शने व विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

श्रींच्या चरणाजवळ प्राप्त होणारी तसेच भेट स्वरूपात येणारी महावस्त्रे नियमानुसार विगतीकरण, मूल्यांकन व पॅकिंग करून भाविकांना स्टॉलच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येतात. त्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आला आहे. तथापि, नवरात्र कालावधीत मोठ्या प्रमाणात महावस्त्रे प्राप्त झाल्याने ती भाविकांना उपलब्ध करून देण्यासाठी विशेष महावस्त्र सेल आयोजित करण्यात आला आहे. हा महासेल दि. २९ ऑक्टोंबर ते ३ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत श्री संत तुकाराम भवन, तिसरा मजला, पंढरपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केलेले महावस्त्र प्रसाद स्वरूपात आपल्या घरी नेण्याची ही विशेष संधी असून, भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने या महासेलचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी केले आहे.

# सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय जंतनाशक मोहीम उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलापूर जिल्ह्यात १ ते १९ वयोगटातील बालकांना जंतमुक्त करण्यासाठी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम आज संपूर्ण जिल्ह्यात उत्साहात राबविण्यात आली. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील एकूण ९ लाख ८३ हजार ७०६ बालकांना जंतनाशक गोळ्या देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**९ लाख ८३ हजारांहून अधिक बालकांना जंतमुक्त करण्याचे उद्दिष्ट; पालकांनी सहकार्य करावे**

जिल्ह्यातील शाळा, अंगणवाड्या आणि आरोग्य संस्थांच्या माध्यमातून १ ते १९ वयोगटातील बालकांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात आले. बालकांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांच्यातील रक्तक्षय व अशक्तपणा कमी व्हावा आणि त्यांची शारीरिक व बौद्धिक वाढ योग्य प्रकारे व्हावी, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील आयुष्मान आरोग्य मंदिर, कोंडी येथे भेट देऊन मोहिमेच्या कामाचा आढावा घेतला. त्यानंतर जिल्हा परिषद शाळा, कोंडी येथे विद्यार्थ्यांना स्वतःच्या हस्ते जंतनाशक गोळ्या देऊन मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना जंतमुक्तीचे महत्त्व समजावून सांगितले.

**जंतमुक्तीमुळे बालकांचे आरोग्य आणि भविष्य सुरक्षित**

यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन म्हणाले, जंतसंसर्गामुळे बालकांमध्ये रक्तक्षय, अशक्तपणा निर्माण होऊ शकतो. तसेच त्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासावरही परिणाम होऊ शकतो. जंतनाशक गोळ्यांच्या नियमित सेवनामुळे बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.



**मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे आवाहन**

जिल्ह्यातील ९ लाख ८३ हजारांहून अधिक बालकांपर्यंत या मोहिमेचा लाभ पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे.

मोहिमेच्या दिवशी ज्या बालकांना जंतनाशक गोळी घेता आली नाही, अशा बालकांना ३ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित मॉप-अप राऊंडमध्ये गोळी देण्यात यावी. यासाठी पालकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहनही मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी केले.

या कार्यक्रमास सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत आयवळे, आयुष्मान आरोग्य मंदिराचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कांबळे, जिल्हा परिषद शाळा कोंडीचे मुख्याध्यापक, वर्गशिक्षक तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चारा टंचाईवर मात करण्यासाठी शंभर टक्के अनुदानावर मोफत चारा बियाणे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलापूर जिल्ह्यात संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून शंभर टक्के अनुदानावर मोफत चारा बियाणे वाटपाची योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत उच्च उत्पादन क्षमता असलेल्या मका व ज्वारीच्या चारा वाणांच्या बियाण्यांचे वितरण जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत करण्यात येणार आहे.



जिल्ह्यातील पशुधनासाठी पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध व्हावा, तसेच संभाव्य चारा टंचाईच्या परिस्थितीवर प्रभावीपणे मात करता यावी, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे.

**सिंचन सुविधा असलेल्या पशुपालकांनी योजनेचा लाभ घ्यावा; जिल्हा प्रशासनाचे आवाहन**

**सिंचन सुविधा असलेल्या पशुपालकांना प्राधान्य**

ज्या पशुपालकांकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे आणि जे चारा लागवड करण्यास इच्छुक आहेत, अशा सर्व पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. यासाठी पशुपालकांनी विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरून आवश्यक कागदपत्रांसह तसेच सिंचन सुविधा उपलब्ध असल्याच्या पुराव्यासह संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यात जमा करावा. अर्ज सादर केल्यानंतर बियाणे उपलब्ध झाल्यावर त्याचा वापर करून पशुपालकांनी चारा लागवड करावी. मका व ज्वारीच्या उच्च उत्पादनक्षम चारा वाणांच्या लागवडीतून चाऱ्याचे उत्पादन वाढविण्यास मदत होणार आहे.

**चारा उत्पादन वाढविण्यासाठी सहभागी व्हा**

सोलापूर जिल्ह्यात संभाव्य चारा टंचाई टाळण्यासाठी अधिकाधिक पशुपालकांनी या योजनेत सहभागी होऊन मोठ्या प्रमाणावर चारा लागवड करावी. जिल्ह्यात चारा उत्पादन वाढवून पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करण्याच्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा उपाआयुक्त पशुसंवर्धन डॉ. अनलि तांबे वतीने करण्यात आले आहे.

# दक्षता जनजागृती सप्ताह निमित्ताने महाराष्ट्र सदनात शपथ





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भ्रष्टाचार निर्मूलन, पारदर्शकता आणि प्रशासकीय कामकाजात सचोटीची मूल्ये रुजविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सदन येथे आज दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सत्यनिष्ठेची शपथ घेण्यात आली. निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना शपथ दिली.

दक्षता जनजागृती सप्ताह दि. २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. सार्वजनिक प्रशासनात प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविणे तसेच भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदेशांचे श्री गायकवाड यांनी वाचन केले. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि सार्वजनिक जीवनातील नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करून सत्यनिष्ठेच्या तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, उपअभियंता कुलदीप पाटील, उपअभियंता गंगवार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक सारिका शेलार, प्रमोद कोलपते यांच्यासह महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

??????????????????????????????????????????

# निलेगाव शिवारातील दोन पानबुडी विद्युत मोटार चोरीस : शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील निलेगाव शिवारातून लक्ष्मी कंपनीच्या दोन शेतकऱ्यांच्या विहिरीवरील दोन विद्युत मोटार चोरीस गेल्याची घटना घडली असून या परिसरातील शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून या घटनेमुळे नळदुर्ग पोलिसांपुढे एक मोठे आव्हान उभे राहिले आहे.

याबाबत माहिती अशी की तुळजापूर-अक्कलकोट सीमारेषेवर वसलेल्या तुळजापूर तालुक्यातील निलेगाव येथील गट नंबर १३६ मध्ये असलेल्या चंद्रकांत पंढरी दुपारगुडे व गेनू पंढरी दुपारगुडे यांच्या शेतातील विहिरीतून लक्ष्मी कंपणीच्या ५ - क्ष्म च्या दोन पाणबुडी विदुत मोटार चोरीस गेल्याची घटना दि.२५ऑक्टोबर २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास घडली असून या प्रकारामुळे निलेगाव परिसरातील शेतकऱ्यांमध्ये एक चिंतेचे वातावर पसरले आहे.

या वर्षी पावसाचेअत्यंत कमी प्रमाण झाल्याने एक तर शेतकऱ्याच्या हातातून खरीप व रब्बी हंगामातील पिके गेलेली आहेत. शासनाने कोरडा दुष्काळ जाहीर केलेला आहे.अद्याप शेतकऱ्याला कसल्याही प्रकारची मदत मिळालेली नाही अशा परिस्थितीत दुष्काळाच्या झळा सोसत शेतकरी आपल्या विहिरीत उपलब्ध पाण्यावर आधारित कांद्याचे व गव्हाचे पीक घेण्यासाठी लागवड केलेली आहे. हे पीक जमिनीवर उभे असताना सध्या त्या पिकांना पाण्याची गरज आहे परंतु सदर मोटर चोरी प्रकरणामुळे शेतकऱ्याच्या हातातून हे ही पिक जाण्याची शक्यता आहे.

सध्या दिवसा उन्हाळा रात्री हिवाळा आणि गायब पावसाळा असी परिस्थिती आहे.यामुळे दिवसेन दिवस चोरीचे प्रमाण निश्चितच वाढण्याची शक्यता असून नळदुर्ग पोलिसा याबाबत सतर्क राहणे गरजेचे आहे.नळदुर्ग पोलिसां समोर अशा भुरट्या चोरट्यांचे मोठे आवाहन उभे राहिले आहे. अनेक वेळा अशा प्रकारच्या चोरी च्या घटना घडतात. संबंधित शेतकरी हे नळदुर्ग पोलीस ठाणे येथे तक्रार देतो. परंतु अद्याप एकाही चोरी प्रकरणाचा छडा पोलिसांकडून लागलेला नाही. नळदुर्ग बस स्थानक परिसरात अनेक वेळा वृद्ध महिलांचे गळ्यातील सोन्याचे दागिने वगैरे चोरी गेल्याच्या घटना घडलेल्या आहेत.रितसर तक्रार देऊनही, सीसीटीव्ही कॅमेरे असूनहीअशा प्रकारच्या घटनांचा तपास पोलीसा कडून लाग'त





नाही त्यामुळे सामान्य नागरिक हतबल झालेला दिसून येत आहे.आमचा नेमका वाली कोण, या चोरी प्रकरणाला नेमका कसा व कोणी आळा बसवावा नळदुर्ग पोलीस ठाणे असून तोटा नसून कळंबा म्हटल्याप्रमाणे झाले आहे.अशी उलट सुलट चर्चा नळदुर्ग परिसरात होत असताना दिसत आहे.

# आमदार अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला मोठे यश! केईएम हॉस्पिटलला रुग्णाचे ₹१०.२५ लाख परत करण्याचे आदेश

## विधानसभेच्या अधिवेशनात रुग्णांच्या हक्कांसाठी आवाज उठवला; धर्मादाय सहआयुक्तांच्या आदेशामुळे अश्विनी पाटील यांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : धर्मादाय योजनेअंतर्गत उपचारांचा लाभ न मिळाल्याने KEM हॉस्पिटल, पुणे येथे उपचारासाठी १० लाख २५ हजार रुपये भरावे लागलेल्या सौ. अश्विनी सोमनाथ पाटील यांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेच्या अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करून रुग्णांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. तसेच, पुणे विभागाचे धर्मादाय सहआयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित रुग्णालयाविरोधात कारवाईची मागणी केली. आमदार अभिजीत पाटील यांच्या या



पाठपुराव्याला यश आले असून, धर्मादाय सहआयुक्त तथा देखरेख समितीने KEM हॉस्पिटलला संबंधित रुग्णाच्या नातेवाइकांना १० लाख २५ हजार रुपये १५ दिवसांच्या आत परत करण्याचे निर्देश दिले आहेत. हा आदेश ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पारित करण्यात आला आहे.

विधानसभेच्या अधिवेशनात आमदार अभिजीत पाटील यांनी मांडला रुग्णांच्या हक्कांचा प्रश्न!

धर्मादाय योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना उपचारांचा लाभ मिळणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात रुग्णांना लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असल्याचा गंभीर मुद्दा आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेच्या अधिवेशनात उपस्थित केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचारांसाठी आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये आणि पात्र रुग्णांना धर्मादाय योजनेचा लाभ मिळावा, यासाठी त्यांनी सभागृहात आपली भूमिका ठामपणे मांडली.

अश्विनी पाटील यांच्या प्रकरणातही धर्मादाय योजनेअंतर्गत उपचारांचा लाभ न मिळाल्याने कुटुंबीयांना १० लाख २५ हजार रुपये भरावे लागल्याची बाब समोर आल्यानंतर आमदार अभिजीत पाटील यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू केला. त्यांनी पुणे विभागाच्या धर्मादाय सहआयुक्तांना पत्र देऊन संबंधित रुग्णालयाविरोधात तक्रार दाखल केली आणि रुग्णाला भरलेली रक्कम परत मिळवून देण्याची मागणी केली. विधानसभेतील आवाज आणि प्रशासकीय पातळीवरील पाठपुरावा यामुळे या प्रकरणाला महत्त्व प्राप्त झाले.

**नेमके प्रकरण काय?**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील पटवर्धन कुरवली येथील सौ. अश्विनी सोमनाथ पाटील या २२ सप्टेंबर २०२५ रोजी उपचारासाठी KEM हॉस्पिटल, पुणे येथे दाखल झाल्या होत्या. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले होते. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित उपचार शासनाच्या योजनेअंतर्गत होऊ शकत असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले होते. मात्र, शस्त्रक्रियेपूर्वी अनामत रक्कम म्हणून १० लाख २५ हजार रुपये भरण्यास सांगण्यात आले.

एवढी मोठी रक्कम उभी करताना रुग्णाच्या कुटुंबीयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. धर्मादाय योजनेअंतर्गत उपचारांचा लाभ का मिळाला नाही, हा प्रश्न उपस्थित करत या प्रकरणात योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

या प्रकरणाची सुनावणी आणि उपलब्ध कागदपत्रांचा विचार करून धर्मादाय सहआयुक्त तथा देखरेख समितीने तक्रार अर्ज क्रमांक १३/२०२६ मंजूर केला.

**१५ दिवसांत ₹१०.२५ लाख परत करण्याचे आदेश**

धर्मादाय सहआयुक्त तथा देखरेख समितीने ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, KEM हॉस्पिटल, पुणे यांना सौ. अश्विनी सोमनाथ पाटील यांच्या नावाने ₹१०,२५,०००/- (दहा लाख पंचवीस हजार रुपये) इतक्या रकमेचा धनादेश आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत काढून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे संबंधित रुग्णाच्या कुटुंबीयांना भरलेली रक्कम परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. धर्मादाय योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना उपचारांचा लाभ मिळावा आणि अशा रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

**रुग्णांच्या हक्कांसाठी आमदार अभिजीत पाटील यांचा ठाम पाठपुरावा!**

सर्वसामान्य नागरिकांना गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक संकटाचा सामना करावा लागू नये, तसेच धर्मादाय योजनेचा लाभ पात्र रुग्णांपर्यंत पोहोचावा, यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यापासून ते धर्मादाय सहआयुक्तांकडे तक्रार करण्यापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला.

विधानसभेत आवाज उठवून आणि प्रशासनाकडे प्रभावी पाठपुरावा करून रुग्णांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आणणाऱ्या आमदार अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नांमुळे अश्विनी पाटील यांच्या प्रकरणात दिलासादायक आदेश पारित झाला आहे. रुग्णांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाठपुराव्याचे हे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरले आहे.

# पंढरपूर अन्नधान्य पुरवठा विभागा विरोधात आमरण उपोषण करणार - गणेश ढोबळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर अन्न व धान्य पुरवठा विभागातील पुरवठा निरीक्षक हे सामान्यत पात्र नागरिकांना शासनामार्फत मोफत दिल्या जाणाऱ्या धान्यापासून वंचित ठेवत असून जे नागरिक या योजनेस पात्र नाहीत अशा नागरिकांना मात्र धान्य मिळत आहे मग हे नेमके घडत कसे तर एजंटांमार्फत पात्र नसलेली प्रकरण खाजगी अनुदान घेऊन ती मंजूर करून घ्यायची आणि सदर योजनेस पात्र असलेल्यांना नियमांवर बोट ठेवत शहरातील नागरीकांना ४४,००० रूपयांचा व ग्रामीण मधिल लोकांना ५९,००० रूपयांचा तलाठी दाखला पाहिजे

म्हणून सांगणे रेशन दुकानदाराचा धान्यास पात्र अपात्र असल्याचा दाखला घेऊन येण्यास सांगणे व जे धान्यास पात्र नाहीत त्यांना मात्र यापैकी कोणत्याही कागदपत्रांन शिवाय शासकीय नियम व अटींचे उल्लंघन करून हे पंढरपूर अन्न व धान्य पुरवठा निरीक्षण अधिकारी धान्य मिळवून देत असल्याचे दिसून येत आहे जे मजुरीकाम करून आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करत आहेत ते मात्र धन्यापासून वंचित आहेत तर जे आयकर भरत आहेत श्रीमंत आहेत ज्यांच्याकडे पाच-पाच दहा एकर जमिनी लाखो रूपये किमती असलेल्या गाड्या आहेत अशांना मात्र शासनामार्फत दिले जाणारे मोफत धान्य मिळत आहे त्यामुळे या पंढरपूर अन्नधान्य पुरवठा विभागाच्या अनागोंदी कारभाराची सोलापूर जिल्हाधिकारी यांनी त्वरित चौकशी लावावी या विभागाचे पुरवठा निरीक्षण अधिकारी यांची तातडीने बदली करावी व जे या योजनेचे खरे पात्र नागरिक आहेत त्यांना या योजनेत समाविष्ट करून घ्याव व शासकीय नियमानुसार जे पात्र नसतील परंतु ते पात्र झाले आहेत त्यांना त्वरित अपात्र कराव या मागणीसाठी पंढरपूर जनशक्ती संघटना तालुका अध्यक्ष गणेश ढोबळे हे सोमवार दि. ०२/११/२०२६ पासून मागण्या मान्य होईपर्यंत पंढरपूर तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती एका लेखी निवेदनाव्दारे पंढरपूर तहसिलदार सचिन लंगुटे यांना गणेश ढोबळे यांनी दिली.

> **पंढरपूर पुरवठा निरीक्षक विजय बादल यांच्याबाबत अनेक नागरिकांच्या व काही रेशन दुकानदारांच्याही विविध तक्रारी असूनही सोलापूर जिल्हा पुरवठा पडोळे हे त्यांना का पाठीशी घालत आहेत अता जो पर्यंत पंढरपूर पुरवठा विभागाचे निरीक्षक विजय बादल यांची बदली होईपर्यंत पंढरपूर तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार**
>
> **- गणेश ढोबळे**
>
> **जनशक्ती संघटना पंढरपूर तालुकाध्यक्ष**





# शिवस्मारकतर्फे किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन, सहभागी होण्याचे सोलापूरकरांना आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे ४ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर दरम्यान नवी पेठ येथील शिवस्मारक पटांगणात किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

दिवाळी म्हटली की लक्ष्मीपूजन, फराळ, सुट्टीची धमाल यांबरोबरच किल्ले बांधणीही डोळ्यांसमोर येते. त्यामुळे शालेय विद्यार्थी आणि महाविद्यालयातील तरूणांना किल्ले बांधणी करण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता दरवर्षीप्रमाणे शिवस्मारकतर्फे किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

अवघ्या देशाचेच दैवत असलेल्या हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे किल्ले म्हणजे भारतीयांसाठी जणू तीर्थक्षेत्रेच आहेत. छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या गडदुर्गांची अधिक विस्ताराने माहिती मुलांना व्हावी या उद्देशाने दरवर्षी शिवस्मारकतर्फे हा उपक्रम राबविला जातो.

ही स्पर्धा शालेय, महाविद्यालयीन व खुला अशा तीन गटांत होणार आहे. शाळा, महाविद्यालयास १० जणांचा एक असे कितीही गट पाठविण्याची मुभा आहे.

किल्ले बांधणीसाठी लागणारे दगड, माती, मुंबई माती, पाणी आयोजकांकडून देण्यात येणार आहे. स्पर्धक संघांनी बुधवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ पासून शनिवार, दि. ७ नोव्हेंबरच्या दुपारी तीन वाजेपर्यंत किल्ले बनविणे अपेक्षित आहे. शनिवार दि. ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता किल्ले प्रदर्शनाचे उद्घाटन हिंदवी स्वराज्याचे सरदार कान्होजी जेधे यांचे १३ वे वंशज श्री. युवराजजी जेधे यांच्या हस्ते होणार असून त्याच दिवशी परिक्षणही होणार आहे. त्यानंतर सोलापूरकरांना किल्ले पाहण्यासाठी उपलब्ध असणार आहेत. तर स्पर्धेचे पारितोषिक वितरण नरवीर शिवा काशीद यांचे १३ वे वंशज आनंदराव काशीद यांच्या हस्ते होणार आहे.

किल्ला बांधणी स्पर्धेसाठीची नोंदणी शाळा, महाविद्यालय आणि खुल्या गटांनी सोमवार दिनांक २ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत शिवस्मारक कार्यालयात करावी. या स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्या संघांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र, पुस्तक देण्यात येणार आहे. तसेच उल्लेखनीय सहभागाकरिता शाळेच्या शिक्षकास, उत्कृष्ट सांघिक काम करणाऱ्या गटास आणि किल्ल्याची योग्य माहिती देणाऱ्या गटास विशेष पारितोषिकही देण्यात येणार आहे. या स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम विजेत्या संघास पाच हजार रुपये, द्वितीय विजेत्या संघास तीन हजार रुपये तर तृतीय विजेत्या संघास दोन हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत अधिकाधिक सोलापूरकरांनी सहभागी व्हावे व अधिक माहितीसाठी शिवस्मारकचे व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर यांच्याशी ९८२२४९८३७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गवसने, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, संचालक पुरुषोत्तम कारकल, संचालिका माधवी कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर उपस्थित होते.

> **विजेत्या संघाला नि: शुल्क गडदर्शन**
>
> शिवस्मारकच्या किल्ला बांधणी स्पर्धेतील विजेत्या गटांना शिवस्मारकतर्फे नि:शुल्क गड दर्शन उपक्रम राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गडाचे दर्शन घेऊन इतिहासाची माहिती जाणून घेता यावी, या हेतूने हा नि:शुल्क गड दर्शन उपक्रम शिवस्मारकतर्फे आयोजित केल्याचे शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी सांगितले.

## निफाड येथे माणकेश्वर वाचनालयाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमालेचे आयोजन

# शारीरिक आरोग्य सोबत मानसिक आरोग्याची काळजी तितकीच महत्त्वाची : डॉ. पि.व्ही. रसाळ





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जीवनामध्ये येणाऱ्या अडचणी ताणतणाव आणि समस्यांना सामोरे जाताना केवळ शारीरिक आरोग्य चांगले असून चालत नाही तर मानसिक आरोग्य सुदृढ असणे तितकेच महत्त्वाचे आहे .असे प्रतिपादन राष्ट्रसंत गाडगे महाराज ज्येष्ठ नागरिक व्याख्यानमालेतील पहिले पुष्पगुंफतांना डॉ पुंडलिक रसाळ म्हणाले

श्री माणकेश्वर वाचनालयाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी संत गाडगेबाबा विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बही:शाल शिक्षण मंडळ आणि श्री माणकेश्वर वाचनालय बाहि:शाल शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव प्रकाश पवार हे होते , यावेळी डॉक्टर रसाळ पुढे म्हणाले की मनातील भावना ओळखणे त्या योग्य व्यक्तीसमोर व्यक्त करणे समस्यांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे आणि गरज पडल्यास मदत घेणे ही निरोगी जीवनाची महत्त्वाची सूत्रे आहेत जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्याची प्रक्रिया म्हणजेच जीवन होय असा महत्त्वाचा संदेश यावेळेस त्यांनी दिला

याप्रसंगी माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार , चिटणीस सुनील चिखले , हिशोब तपासणी दत्ता काका उगावकर, संचालक महेश बनकर विजय धारराव, तनवीर राजे, बाळासाहेब कर्डिले, गुलाबराव टकले, ग्रंथपाल नितीन बनसोडे, ज्येष्ठ नागरिक रघुनाथ कुंदे, शिवाजी जाधव , संपत धारराव , बाळासाहेब खालकर, वसंतराव खालकर,ऍड किरण गुंजाळ ,जगन्नाथ कुंदे, भाऊसाहेब शिंदे, जावेद भाई मणियार, विक्रम रंधवे, बाजीराव लोखंडे, साहेबराव ढोमसे ,अशोक पगारे, सोपान खालकर ,श्रीपत कापडी, संतोष राऊत आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले

**उद्याचे व्याख्यान :-** ओमकार ध्यान, या विषयावर रामेश्वर उगले हे द्वितीय पुष्प गुंफणार आहेत.

# आर.पी.आय चे पुणे शहर सरचिटणीस महादेव कांबळे एक दिलखुलास व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : कुरनूर तालुका अक्कलकोट येथील मूळ रहिवासी असलेले व सध्या हडपसर पुणे येथे राहणारे महादेव कांबळे म्हणजे आर.पी.आय.(आठवले) चे एक झुंजार कार्यकर्ते अत्यंत मनमिळावू स्वभाव, मित भाषि, सर्वांना सोबत घेऊन काम करणारा प्रामाणिक, जिवाभावाचा जिवलग, अनेकांना मदत करणारे, संकटात असलेल्या लोकांना संकटातून बाहेर काढण्यासाठी जिवाची बाजी लावून काम करणारा आणि दिलखुलास व्यक्तिमत्व आज त्यांचे दुःखद निधन झाल्याची बातमी माझे मित्र सुरेश सूर्यवंशी यांनी सांगितली क्षणभर विश्वास बसला नाही पण सत्य स्वीकारावे लागेल. त्यांच्या नंतर पत्रकार वसंत वाघमारे, एस. के. गायकवाड, आणि अनेकांचे फोन आले कांबळे साहेब आपल्यातून गेले ही घटना अत्यंत वाईट झाली.

काही दिवसांपूर्वी सोलापूरहून पुण्याला जाताना त्यांच्या गाडीचा अपघात झाला होता. प्रचंड मुक्कामार लागल्याने त्यांच्या शरीरातील नसा काम करीत नव्हत्या त्यांना दोन तीन हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले होते विश्वराज हॉस्पिटल लोणी काळभोर येथे उपचार सुरु असताना आज त्यांचे निधन झाले आहे. हडपसर परिसरात सर्वांच्या तोंडात महादेव कांबळे हे नाव अत्यंत आदराने घेतले जात होते.या भागातील सर्व कार्यकर्ते हडपसर पोलिस चौकी समोर दररोज भेटायचे मी त्यांना दोन तीन वर्षापासून भेटत होतो माझी अनेक लोकांशी ओळख त्यांनी करुन दिली . महादेव कांबळे यांना सर्व कार्यकर्ते नेते या नावानेच संबोधीत असे नेते आले का आज नेते दिसत नाहीत ते नाही भेटले तर कार्यकर्त्यांना चुकल्यासारखे वाटायचे आज महादेव कांबळे साहेब यांचे अपघाती निधन झाल्यामुळे आता हडपसर चौकिसमोर नेहमी भेटणारे साहेब कधीच भेटणार नाहीत ही कार्यकर्त्यांना आता कायम हूर हूर लागेल.



महादेव कांबळे साहेब पंधरा दिवसाला त्यांच्या मूळ गावी कुरनूर ता. अक्कलकोट ला यायचे आले की नळदुर्गला येत असत इथेही आमच्या भेटी गाठी व्हायच्या ते आवर्जून मला फोन करायचे या मी तुमच्या गावात आलो असे म्हणायचे आम्ही उडुपी मध्ये चहा घ्यायचो ते म्हणायचे इथला चहा फार चांगला आहे. एकदा ते २०२४ मध्ये प्रथमच परिवर्तन सामाजिक संस्थेच्या नळदुर्ग येथील कार्यालयात आले तेव्हा त्यांचा सत्कार केला. त्यांच्याशी बोलल्यावर मन हलके होत असे ते फार मोकळ्या मनाचे होते. त्यांच्या जाण्याने आज त्यांच्या कुटुंबार आणि सर्व कार्यकर्ते यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे हे दुःख सहन करण्याची शक्ती निसर्गाने द्यावी महादेव कांबळे साहेब यांना अत्यंत दुःखी अंतःकरणाने मी माझ्या कुटुंबीयांचे वतीने परिवर्तन सामाजिक संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो

मारुती बनसोडे
सचिव,परिवर्तन सामाजिक संस्था
नळदुर्ग ता.तुळजापूर
जि.धाराशिव